# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:20.04.2024** **वार:शनिवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात काल देशभरात 102 मतदारसंघात 62 पूर्णांक 37 टक्क्यांहून अधिक मतदान
2. महाराष्ट्रातही पहिल्या टप्प्यात पाच मतदारसंघात 60 पूर्णांक 22 टक्के मतदान
3. उन्हाळ्याच्या सुटीसाठी रेल्वेचं प्रवासी गाड्यांच्या विक्रमी 9111 फेऱ्यांचं आयोजन
4. आय पी एल क्रिकेटमध्ये आज दिल्ली कॅपिटल्सचा सामना सनरायझर्स हैदराबादशी आणि
5. महाराष्ट्रात उन्हाच्या झळा वाढल्या, अनेक शहरांत कमाल तापमान 40 अंशांच्या पुढे

**<u>पहिला टप्पा मतदान</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात काल मतदान झालेल्या 102 लोकसभा मतदारसंघात जागांवर रात्री 9 वाजेपर्यंत 62 पूर्णांक 37 टक्क्यांहून अधिक मतदान झाल्याची नोंद झाली आहे. नागरिकांनी उष्णतेच्या तीव्र लाटेतही जबाबदारीपूर्वक आणि उत्साहानं आपला मतदानाचा हक्क बजावला. सर्वत्र मतदान शांततेत पार पडलं.

महाराष्ट्रातील लोकसभेच्या पाच जागांवर 60 पूर्णांक 22 टक्के मतदान झालं, पश्चिम बंगालमधल्या तीन जागांवर 77 पूर्णांक 57 टक्क्यांहून अधिक मतदान झालं, तर उत्तर प्रदेशातील आठ जागांवर 58 पूर्णांक 49 टक्क्यांहून अधिक, बिहारच्या चार जागांवर 48 पूर्णांक 50 टक्क्यांहून अधिक, राजस्थानच्या आठ लोकसभा मतदारसंघांसाठी 56 पूर्णांक 58 टक्क्यांहून अधिक, आसामच्या पाच जागांवर 72 पूर्णांक 10 टक्क्यांहून अधिक मतदान झालं. तामिळनाडूमध्ये सर्व 39 जागांसाठी पहिल्या टप्प्यात 65 पूर्णांक 19 टक्क्यांहून अधिक मतदान झालं. उत्तराखंडमधल्या पाचही जागांवर 54 पूर्णांक 06 टक्के मतदान झालं आणि छत्तीसगडमधल्या एका जागेवर 63 पूर्णांक 41 टक्के मतदान झालं. तर त्रिपुरातील लोकसभेच्या एका जागेवर 80 पूर्णांक 17 टक्के मतदानाची नोंद झाली. लोकसभा निवडणुकीच्या या पहिल्या टप्प्यात एकूण 1625 उमेदवार रिंगणात होते.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, सर्बानंद सोनोवाल, किरेन रिजिजू, डॉक्टर जितेंद्र सिंग, संजीव बल्यान तसंच भाजप नेते तमिलिसाई सुंदरराजन आणि जितिन प्रसाद तर काँग्रेस नेते गौरव गोगोई, कार्ती चिदंबरम, नकुल नाथ आणि द्रमुकचे दयानिधी मारन या प्रमुख राजकीय नेत्यांचं भवितव्य मतपेटीत बंद करण्यात आलं आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातही या पहिल्या टप्प्यात लोकसभेच्या पाच मतदारसंघातील मतदान काल शांततेत पार पडलं. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत अंदाजे 60 पूर्णांक 22 टक्के मतदान झाल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. या पहिल्या टप्प्यात पाच लोकसभा मतदारसंघांची मतदानाची टक्केवारी अशी होती. रामटेक मतदारसंघात 58 पूर्णांक 50 टक्के, नागपूरमध्ये 53 पूर्णांक 71 टक्के, भंडारा गोंदिया मतदारसंघात 64 पूर्णांक 08 टक्के, गडचिरोली- चिमूरमध्ये 67 पूर्णांक 17 टक्के आणि चंद्रपूर मतदारसंघात 60 पूर्णांक 03 टक्के मतदान झाल्याची नोंद झाली आहे.

निवडणूक आयोगानं मतदारांचे आणि संपूर्ण निवडणूक यंत्रणेचे आभार मानले आहेत. छत्तीसगडच्या बस्तरमधील 56 गावांनी आणि ग्रेट निकोबारच्या शोम्पेन जमातीतल्या नागरिकांनी काल पहिल्यांदाच मतदान केलं. याशिवाय पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या नवमतदारांनीही मोठ्या संख्येनं मतदान प्रक्रियेत उत्साहानं सहभाग घेतला. गजबजलेल्या शहरांमधल्या केंद्रांपासून ते

दुर्गम गावांपर्यंत मतदान केंद्रांवर विविध प्रकारची पार्श्वभूमी असलेल्या मतदारांचा एकत्रित सहभाग पाहायला मिळाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. तसंच निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या काटेकोर नियोजनामुळे मतदान प्रक्रिया निर्विघ्न पार पडली.

**<u>प्रतिक्रिया</u>**

यंदाची ही लोकसभा निवडणूक केवळ एक खासदार निवडून आणण्याची निवडणूक नसून ती देशाची निवडणूक आहे. देशाचं भविष्य निश्चित करण्यासाठी आणि येत्या पाच वर्षात देशाला जगातली एक मोठी शक्ती बनवण्यासाठीची ही निवडणूक आहे, असं पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी म्हणाले. ते काल मध्य प्रदेशातल्या दमोह इथं एका प्रचार सभेत बोलत होते. जगात युद्धाचं वातावरण असताना भारतात युद्धपातळीवर काम करणाऱ्या सरकारची नितांत गरज असून हे काम पूर्ण बहुमत असलेलं भाजप सरकारच करू शकतं, असंही मोदी यावेळी म्हणाले.

**<u>पंतप्रधान वर्धा प्रचारसभा</u>**

महाराष्ट्रात नागपूर-मुंबई समृद्धी द्रुतगती महामार्ग, नागपूर-गोवा हरित महामार्ग, वर्धा-यवतमाळ-नांदेड-दरम्यानचं रेल्वे मार्गांचं जाळं, सिंदी रेल्वेस्थानकावरचं ड्राय पोर्ट, आणि अमरावतीमधलं टेक्सटाईल पार्क यासारख्या विकास प्रकल्पाममुळ, एकेकाळी राज्यातला मागास प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विदर्भाचा चेहरामोहरा बदलणार आहे, असं मत पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं. ते काल वर्ध्यातील तळेगाव इथं निवडणूकीच्या प्रचार सभेत बोलत होते. यावेळी त्यांनी वर्धा लोकसभा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार रामदास तडस यांना निवडून देण्याचं जनतेला आवाहन केलं.

**<u>चलनवाढ</u>**

चलनवाढीच्या जोखमींबद्दल विशेषत: अन्नधान्याच्या किमतींमधल्या अनिश्चिततेमुळे रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीच्या बहुतांश सदस्यांनी सावधगिरी व्यक्त केली आहे. समितीच्या धोरण आढाव्यात, 19 एप्रिल रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सादर करण्यात आलं. मार्च महिन्यामध्ये, देशाच्या किरकोळ विक्री चलनवाढीचा दर 4 पूर्णांक 85 टक्क्यांच्या दहा महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आला आहे, जो फेब्रुवारी महिन्यामध्ये 5 पूर्णांक 09 टक्के होता. तर महागाईचा दर 2023 च्या मे महिन्यात 4 पूर्णांक 31 टक्के इतका सर्वात कमी होता. हा तपशील सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं 12 एप्रिलला जाहीर केला.

**<u>जी-7 बैठक</u>**

जी -7 देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या गटानं, इस्रायलवर केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यासाठी, इराणवर नवीन निर्बंध लादण्याचा इशारा दिला आहे. तसंच दोन्ही बाजूंनी संघर्ष टाळण्याचं आवाहन केलं आहे. ताज्या घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी तीन दिवसीय बैठकीचा अजेंडा बदलण्यात आला असल्याची माहिती इटलीचे परराष्ट्र मंत्री अँटोनियो ताजानी यांनी इटलीतल्या कॅप्री इथं औद्योगिक देशांच्या मंत्र्यांच्या बैठकीत अध्यक्षस्थानावरून दिली. दरम्यान, इस्रायलनं काल आपल्यावरील हल्ल्याचा बदला म्हणून इराणवर हल्ला केला. माध्यमांच्या अहवालानुसार, ड्रोन दिसल्यानंतर इराणनं, मध्य इराण शहर इस्फहानजवळील प्रमुख हवाई तळ आणि आण्विक केंद्रावरून गोळीबार केला.

**<u>डीआरडीओ</u>**

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात डीआरडीओनं काल स्वदेशी उन्नत ॲच्युएटर आणि एअरब्रेक कंट्रोल मॉड्यूल्सची पहिली तुकडी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडला सुपूर्द केली. डीआरडीओच्या एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सीनं हैदराबादच्या संशोधन केंद्र आणि बेंगळुरूच्या केंद्रीय विनिर्माण तंत्रज्ञान संस्थेच्या सहकार्यानं वैमानिक तंत्रज्ञानाच्या स्वावलंबनादिशेनं हे महत्त्वपूर्ण पाउल उचललं आहे असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. अद्ययावत ॲच्युएटर आणि एअरब्रेक कंट्रोल मॉड्यूलसाठी उड्डाण चाचण्या यशस्वीपणे पूर्ण केल्यामुळे त्यांच्या उत्पादन मंजुरीचा मार्ग मोकळा झाला आहे, ज्यामुळे हिंदुस्तान एयरोनॉटिक्स लिमिटेडला तेजस विमानांच्या नवीन आवृत्तीसाठी सक्षम केलं जाईल.

**रेल्वे**

उन्हाळ्याच्या सुटीतली प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन रेल्वेनं या हंगामात प्रवासी गाड्यांच्या विक्रमी 9111 फेऱ्यांचं आयोजन केलं आहे. गेल्या वर्षीच्या उन्हाळ्यातल्या फेऱ्यांपेक्षा ही संख्या 2742 नं अधिक आहे. महाराष्ट्रासह अन्य 13 राज्यांमध्ये रेल्वेच्या विभागीय मंडळांनी या अतिरिक्त प्रवासी गाड्यांचं नियोजन केलं आहे. सर्व रेल्वे स्थानकांवर पिण्याचं पाणी उपलब्ध करुन देण्याचे तसंच गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी चोख व्यवस्था तैनात करण्याचे निर्देश वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल रात्री लखनौ सुपर जायंट्सनं चेन्नई सुपर किंग्जचा आठ गडी राखून पराभव केला. 177 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनौनं 19 षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात 180 धावा केल्या. लखनौकडून केएल राहुलनं 53 चेंडूत 82 धावांचं योगदान दिलं. त्याआधी चेन्नईनं प्रथम फलंदाजी करताना निर्धारित 20 षटकांत 6 गडी गमावून 176 धावा केल्या होत्या. चेन्नईकडून रवींद्र जडेजानं 40 चेंडूत सर्वाधिक 57 धावा केल्या. या सामन्यात केएल राहुलला सामनावीर घोषित करण्यात आलं. आयपीएल क्रिकेटमध्ये आज दिल्ली कॅपिटल्सचा सामना सनरायझर्स हैदराबादशी होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होईल.

**हवामान**

महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत काहीशी वाढ झाली आहे. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान मालेगाव इथं 43 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. पुणे, अहमदनगर, सोलापूर, जळगावसह विदर्भ-मराठवाड्यातल्या अनेक शहरांत तापमानाचा पारा 40 अंशांच्या पुढे गेला. नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर शहरांमध्येही काल कमाल तापमान 40 अंशांच्या आसपास होतं. आज मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे. कोकणात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं; नमस्कार.